स्मार्ट मित्र-मैत्रिणींनो,

सध्या पावसाळा संपून हिवाळा सुरू होण्याच्या मार्गावर आहे. मध्ये काही काळ ऑक्टोबरचा उकाडा अनुभवावा लागेल. त्यानंतर थंडगार हिवाळा! या काळात निसर्गातही अनेक बदल होतात. पावसाळ्यात फुललेली फुले आणि हिरवळ हळूहळू कमी होत जाते. हळूहळू झाडांची पानेसुद्धा गळायला लागतात. त्याकडे लक्ष ठेवा, या बदलांचे निरीक्षण करा. मग निसर्गात किती मजा आहे हे समजेल.

दोस्तांनो, गाथा ३१ च्या उत्तरामध्ये चूक झाली आहे. जंगलतोड झाल्यामुळे कार्बन वायूचे प्रमाण वाढते की कमी होते, असा प्रश्न होता. त्याचे उत्तर छापून आले आहे- **कमी होते**. पण ते **वाढते** असे हवे होते. कारण झाडे हवेतील कार्बन वायू शोषून घेतात. जंगलतोड झाली की झाडे कमी होतात व कार्बन वायू जास्त प्रमाणात शोषून घेतले जात नाहीत. त्यामुळे त्याचे प्रमाण वाढते. आपल्या एक वाचक डॉ. श्रीमती सु. वि. ठाकूरदेसाई यांनी ही चूक लक्षात आणून दिली. आपणही गाथेबाबत प्रतिक्रिया पाठवा.

**पत्ता- लोकसत्ता, ३/११, अरोरा टॉवर्स, ९ ए मोलेदिना रोड, लष्कर, पुणे- ४११००१** (पत्राच्या पाकिटावर 'गाथा ज्ञानाची' असे आवर्जून लिहा) किंवा पुढील अॅड्रेसवर ई-मेल करा- loksattagatha2008@gmail.com

(गाथेच्या ४० ते ४५ भागांची उत्तरे पुढीलप्रमाणे)

**प्रश्न ४०- गरिबी हटविण्यामधील एक प्रमुख अडथळा कोणता आहे?**

उत्तर- हवामानबदलाचा.

**प्रश्न ४१- स्थलांतराच्या वेळी गेल्या वर्षी रेनडियरचा मृत्यू कशामुळे झाला?**

उत्तर- उपासमारीमुळे.

**प्रश्न ४२- गल्फ प्रवाह उबदार की थंड पाण्याचा आहे?**

उत्तर- उबदार पाण्याचा.

**प्रश्न ४३- हवामानबदलामुळे जगाच्या एकूण उत्पादनात किती घट होण्याचा इशारा स्टर्न यांनी दिला आहे?**

उत्तर- वीस टक्क्यांपर्यंत.

**प्रश्न ४४- हवामानात होणारे बदल हा नैसर्गिक चक्राचाच भाग आहे, असे काही अभ्यासकांचे मत आहे का?**

उत्तर- होय.

**प्रश्न ४५- हवामानाच्या सखोल नोंदी गेल्या किती वर्षांपासून घेतल्या जात आहेत?**

उत्तर- साधारणतः दीडशे वर्षांपासून.



MAHARASHTRA
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
प्रस्तुत

## लोकसत्ता गाथा ज्ञानाची





**लक्षात ठेवा**

**ध्वनीची विहीत पातळी**

दिवस - स.६ ते रात्रो १० - ५५ (dB)

रात्र - रात्री१० ते स. ६ - ४५ (dB)

MAHARASHTRA
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

Website: http://mpcb.mah.nic.in


**गुरुवार, दि. ०९.१०.२००८ सकाळी ७.४० वा. आकाशवाणीच्या अस्मिता वाहिनीवर जागर पर्यावरणाचा कार्यक्रम ऐका.**

**तज्ज्ञ : अ. पा. देशपांडे (मराठी विज्ञान परिषद)** **मुलाखत : रविराज गंधे**